न्मयाचें ॥ २ ॥ ते स्थिती निश्चयें संक्षेपें अन्वयें । ऐके आणि होय तूं हीं तैसा ॥ ३ ॥ ज्ञान निष्ठावंत परात्परीं चित्त । योगीया अतीत तुका झाला ॥ ४ ॥

॥ ७९२६ ॥ चित्त जें निष्काम भजे आत्माराम । तोची घाली नेम कर्णासी रे ॥ १ ॥ धरूनी धारणें योगाच्या विंदाणें । जगीं विचरणें निरंकुश ॥ २ ॥ शब्दस्पर्शादिक विषय दशक । त्यागी नपुंसक जारीण ते ॥ ३ ॥ प्राप्तीचा हरीख अप्राप्तीचें तीख । तुका शिव वीख प्राशीत जा ॥ ४ ॥

॥ ७९२७ ॥ नावडे लौकिक संगु प्रपंचीक । आहार रसीक भरे पोटा ॥ १ ॥ मना वाचें कायें नेमित निग्रहें । न पीडी आग्रहें शिष्यवर्गी ॥ २ ॥ तिष्ठे सदा मन योगाचें आसन । सोडूं नेणें ध्यान ईश्वराचें ॥ ३ ॥ धरी बळकटा वितराग् दारवंटा । तुका ह्मणे तोटा नफा नेणें ॥ ४ ॥

॥ ७९२८ ॥ तनु बळा नेणें गर्वास टाळणें । अहं चळवणें ठीकाणीचा ॥ १ ॥ कामा भंगीतसा क्रोध केला पीसा । धाडी दीशा वसा परिग्रहो ॥ २ ॥ मेली जेथें ममता अन्न अन्न करितां । शांतीची दुहिता वाढवीली ॥ ३ ॥ ते ब्रह्म जीवा या भावें अर्पूनियां । झाला उतरायि या तुकयाचा ॥ ४ ॥

॥ ७९२९ ॥ सुप्रसन्न आत्मा त्याचा वीरोत्तमा । झाला जेव्हां ब्रह्मसंगमांत ॥ १ ॥ मग त्या परतीं इच्छा ते कैउती । शोक तरी हंती धरी कैसा ॥ २ ॥ जेथें तेथें माझी भक्ति गंगेमाझी । सर्वभूतें आजी शुद्ध झालीं ॥ ३ ॥ समान सर्वांत शांती हेलावत । तुका ह्मणे मात हरपली ॥ ४ ॥

॥ ७९३० ॥ ते गा सर्वात्मता भक्तिचा जाणता । झाला सप्रेमता देहभावें ॥ १ ॥ अनंत ब्रह्मांडें अनंतींच घडे । अनंता सौंगडे केले जीवा ॥ २ ॥ तत्त्वीं प्रवेशला प्रांताचे वेळेला । जया लेशें आला तेथें गुप्त ॥ ३ ॥ पुन्हा मग निघणें प्राणांतीहीं नेणें । ऐसी स्थिती बाणें तुकयास ॥ ४ ॥

॥ ७९३१ ॥ कर्म घडतें सारें संचीतआधारें । जाणता विचारें यथायोग ॥ १ ॥ मग तेंच कर्मा मातें वीरोत्तमा । अर्पीतो सप्रेमा मदाश्रित ॥ २ ॥ माझीया प्रसादें तो पावे स्वानंदें । अव्यय जे पदें अनुच्छिष्टें ॥ ३ ॥ शाश्वतपणाची गति नेणें वीरंची । तेथें तुकयाचें येणें झालें ॥ ४ ॥

॥ ७९३२ ॥ सर्व कर्में पार्था अर्पूनी सर्वथा । ऐके माझी कथा अखंडित ॥ १ ॥ मत्पर मनानें करी हरिध्यान । डोले स्वानंदाने निर्विकल्प ॥ २ ॥ ज्ञानाचा अथवा योगाचा पांडवा । आश्रय राखाव

मन पक्षी ॥ ३ ॥ तूंच ऐसा होय मद्रूपीं संशय । नाहीं आण वाहे तुका जेथें ॥ ४ ॥

॥ ७९३३ ॥ मच्चित्तें करून मद्रार्थ पाऊन । होय समाधान मत्प्रसादें ॥ १ ॥ दुःखगीरि जळे न वंचतां पळे । सर्वेही मावळे क्लेश कांटा ॥ २ ॥ आतां अहंकारें जरी या नीतिरे । नायकसी बारे घात तुझा ॥ ३ ॥ मद्वाक्यें तरला बहुलोक बुडाला । जें नाहीं तुक्याला केलें मान्य ॥ ४ ॥

॥ ७९३४ ॥ अहंपणें म्हणसी न भांडे मी यासी । यास्तव ढेळसी आमुचें मत ॥ १ ॥ कौरवां मारणें पापी व्हावें कोणें । दिसे लाजिर्वाणें जीणें पुढें ॥ २ ॥ हें मिथ्या कल्पित तनु स्वभावांत । सहज होईल घात कौरवांचा ॥ ३ ॥ प्रकृती क्षत्रियांची अनीवार साची । तुका ह्मणे अरिची पुर्वीन पाठ ॥ ४ ॥

॥ ७९३५ ॥ कर्म प्रादुर्भाव संस्कार या परी । वागे धरेवरी भूत जात ॥ १ ॥ प्रारब्धें बांधलें तें कैसें सुटेल । जरी कां दाटेल उर मोहें ॥ २ ॥ न इच्छिसी स्नेहें अगत्य करिसी । तूंची क्रोधी होसी काळासम ॥ ३ ॥ तुका ह्मणे देहस्वभाव कवणा । नावरे हें जाणा विधी लेख ॥ ४ ॥

॥ ७९३६ ॥ सकळ भूतांच्या हृदयीं देव आहे । अनुभवें पाहे वीरोत्तमा ॥ १ ॥ त्यास मान्य झालें तरेल तें कर्म । अमान्य अकर्म सहज ची ॥ २ ॥ जो कां बुद्धिसूत्रें कळावेळ यंत्रें । नाचवी सर्वत्रें बाहूलिया ॥ ३ ॥ एकास पळवी पाठी लावी एका । हरपवी तुका पळमात्रें ॥ ४ ॥

॥ ७९३७ ॥ त्यातें शरण जावें काया वाचा मनें । व्हावें गा अनन्य अनन्यानी ॥ १ ॥ भाव भक्ति बोध राहे चिरंतन । ऐसें घे मागून प्रसादास ॥ २ ॥ त्याच्या अशीर्वादें शांति प्राप्त होय । जें पद आलय शाश्वताचें ॥ ३ ॥ ऐसा लाभ जाणा न सोडी अर्जुना । तुका जैसा मना समर्पीता ॥ ४ ॥

॥ ७९३८ ॥ ऐसें हें गुह्याचें अंतर जें गुप्त । कधीं प्रगटीत झालें नव्हतें ॥ १ ॥ ऐसा श्रोता कोणी नव्हतां मीळाला । जो प्रेमे अथीला परीपूर्ण ॥ २ ॥ तुज ज्ञान श्रेष्ठ उपदेशीलें आह्मीं । पाहे अंतर्यामी अशेष जें ॥ ३ ॥ या वरी मानेल तें करी वीरेशा । तुक्याची अशा पूर्ण येणें ॥ ४ ॥

॥ ७९३९ ॥ सर्वां गुह्यामाजी गुह्य हें किरीटी । हे नव्हे चावटी बाजारी गा ॥ १ ॥ आतां ऐकें शब्द हा जो शेवटींचा । कां कीं सद्बुद्धीचा घडीव तूं ॥ २ ॥ मित्र माझा आणि म्हणविसी दास । यास्तव हितास सांगतसों ॥ ३ ॥ तुका विनयत्वें मार्थी साधुजनां । काय या अर्जुना बोले देव ॥ ४ ॥

॥ ७९४० ॥ मद्रूपीं सतत यया मना लावी । मद्भक्ती करावी दृढव्रतें ॥ १ ॥ यजन माझेंची वंदावें मातेंची । मग स्वरूपाची पडे ग्रंथी ॥ २ ॥ मीच तूं तूं मीच ऐसें होईल गा । शिवांतरीं जागा जेंवी विष्णु ॥ ३ ॥ विष्णुहृदयीं पहुडे शिव परमात्मा । प्रतिज्ञा प्रतिमा तुकीं येतो ॥ ४ ॥

॥ ७९४१ ॥ सर्व धर्मांप्रती त्यागूनी सखया । शरण माझें ठाया तुवां यावें ॥ १ ॥ एक मी प्रसन्न होईना जोंवरी । धर्माचें आदरी तंव मानी ॥ २ ॥ तेथें धर्मीं वागे मत्कृपा ना ज्यास । सहज पतनास अधिकारू ॥ ३ ॥ संचितें क्रियमाणें पापासी हरीन । भेया ये त्यागुन तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ७९४२ ॥ अतपी पार्था जो त्यास आमुची गोष्टी । कदापी किरीटी न चावळी ॥१ ॥ अथवा तपी झाला मज न भजतां । त्या प्रती हे वार्ता सांगूं नये ॥ २ ॥ तपीं भक्ति खरी श्रवणीं नेदी मन । मग त्या सांगून फळ काय ॥ ३ ॥ किंवा मातें दोष ठेवी जो अर्जुना । तुका ह्मणे जाणा नव्हे पात्र ॥ ४ ॥

॥ ७९४३ ॥ भक्तवृंदीं भक्ती करूनियां मान्य । झाला त्यास धन्य आह्मी ह्मणूं ॥ १ ॥ तेथें गुह्य श्रेष्ठ प्रगटूनी वाणील । तैसाची ऐकेल भावें कोणी ॥ २ ॥ निश्चयें पावन माझ्याठायीं येती । तुकया संगती कीर्ती त्येची ॥ ३ ॥

॥ ७९४४ ॥ मानवकोटींत विचारीतां नित्य । त्या ऐसा सांप्रत नसे कोणी ॥ १ ॥ त्याचा तो प्रियकर येतूला ओळखे । भानु चक्षीं देखे घडेचिना ॥ २ ॥ पुढें ही होणार भविष्यें पाहिलें । परी न पडले लाभा दृष्टीं ॥ ३ ॥ त्या लोकीं मत्प्रीय त्याहूनी दिसेना । तुका विनवी दीना परीक्षीजे ॥ ४ ॥

॥ ७९४५ ॥ नित्य ज्याला नेम उषःकाळीं स्नान । करुनी संध्यापठण करी पाठ ॥ १ ॥ हा धर्म संवाद मज तूज शब्दीं । अनुवादकों नादीं

लागोनीयां ॥ २ ॥ तरी ज्ञान यज्ञें मज तेणें यजिलें । कीं भासे पूजीलें उपचारें ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा आवड जे मोठी । तेची कसवटी भक्ता-माजी ॥ ४ ॥

॥ ७९४६ ॥ हृदयीं जागे ज्याच्या श्रद्धा । जो कां निंदिना विबुधा ॥ १ ॥ ऐके सदा ठेवुनि भाव । ऐशा नराचा उपाव ॥ २ ॥ माझें पद पावे अंतीं । निष्पातक वागुनि क्षितीं ॥ ३ ॥ जेथें लोक पुण्यवान् । तुकया तेथें अधिष्ठान ॥ ४ ॥

॥ ७९४७ ॥ बरी ऐकिली कीं गीता । किंवा न मानीली चित्ता ॥ १ ॥ पार्था मानस एकाग्र । आहे येथें कीं अन्यग्र ॥ २ ॥ अज्ञान मोह खळ । गेला नाहीं कीं प्रांजळ ॥ ३ ॥ सांग मातें धनंजया । एक वेळ हें तुकया ॥ ४ ॥

॥ ७९४८ ॥ ऐके सुरप्रियकार्या । यादवकुळकमलसूर्या ॥ १ ॥ मोह गेला स्मृती आली । चित्तवृत्ती आनंदली ॥ २ ॥ तुझ्या प्रसादें अच्युता। ज्ञानमात्रेचा देखता ॥ ३ ॥ जीं जीं झालों एक वेळ । गतसंदेह प्रांजळ ॥ ४ ॥ असें निश्चळ आतां मी। तुझें वाक्य मानिन स्वामी ॥ ५ ॥ निवटिन कौरवांला । निश्चय रक्षिन तुकयाला ॥ ६ ॥

॥ ७९४९ ॥ श्रीमद्वासुदेव आणि । धनूर्धर गांडिवपाणी ॥ १ ॥ संवादले महाद्भुत । ऐसे कोण या धरेंत ॥ २ ॥ ऐकिलें हो महा भूपा । दावी अद्यापि तनुकंपा ॥ ३ ॥ रोमहर्षणें फूगतां । तुका घाली दंडवता ॥ ४ ॥

॥ ७९५० ॥ राया व्यासकृपेस्तव । या योगाचा अनुभव ॥ १ ॥ ऐकियलें गुह्य ज्ञान । सप्रचीत समाधान ॥ २ ॥ योगेश्वर जो कृष्णजी । तेणें श्रीमुखपंकजीं ॥ ३ ॥ साक्षात्प्रीतिकारोत्तरें । तुका रिझविला आदरें ॥ ४ ॥

॥ ७९५१ ॥ केशवार्जुन उभयांचा । हा हो संवाद सुखाचा ॥ १ ॥ पुण्यदाता महाद्भुत । तूंतें वदलों साद्यंत ॥ २ ॥ पुनःपुन्हा आठवूनी । हर्षतों मी आत्ममनीं ॥ ३ ॥ देवासारिखे त्या पुसे । तुका विनवी ऐका कैसें ॥ ४ ॥

॥ ७९५२ ॥ तें ही स्मरोनी अद्भुत । झाली एकादशीं मात ॥ १ ॥ पार्था विश्वरूप दावी । पुनःपुन्हा मी आठवीं ॥ २ ॥ नृपा मानुनी आश्चर्य। बारंवार स्फुरे आर्य ॥ ३ ॥ सांग तुजला हें सुख। आलें किंवा प्राप्त दुःख ॥ ४ ॥ यया संजयाच्या बोला । अंधू मनांत तापला ॥ ५ ॥ पूर्ख पोरगें

व्यासाचें । भलतें बडबडे जें रूचे ॥ ६ ॥ यासीं बरें दटाउनी । आपलें घ्यावें विचारूनी ॥ ७ ॥ मग बोलिला त्या भावें । जैसें अम्हच्या दशग्रीवें ॥ ८ ॥ शास्त्राध्ययनीं रामास । वाखाणितां धडके त्रास ॥ ९ ॥ तैसें ह्मणे प्रज्ञाचक्षू । राहूं देहा कृष्णपक्षु ॥ १० ॥ खाऊं घालिती पांडव । त्यांचा वलगसी गौरव ॥ ११ ॥ पुरे पुरे हे चावटी । ज्या गा पाणि कक्षुपूटी ॥ १२ ॥ एक पुसतों तें सांग । प्रस्तुत युद्धाचा प्रसंग ॥ १३ ॥ येथें मांडिलें समर । यशश्रीचा कोण वर ॥ १४ ॥ मज भासे माझे सुत । करिती पांडवांचा घात ॥ १५ ॥ यावरि तुझें गा ज्योतिष । सांग ऐकूं दे विशेष ॥ १६ ॥ आमुच्या महा महा धूरा । तिकडे अवघा चाराचुरा ॥ १७ ॥ धर्में मेळविलें पीसें । जेवीं प्रेता पैं कोळसे ॥ १८ ॥ यथा धृतराष्ट्रबोला । चित्तीं संजयो पातळा ॥ १९ ॥ तुका ह्मणे त्याच रीतीं । शिक्षि ऐकावें पंडितीं ॥ २० ॥

॥ ७९५३ ॥ बरें ऐकियलें राया । जे सरवीया बोलसी ॥ १ ॥ आह्मीं कोपावें तें वांया । नमना या गुरूच्या ॥ २ ॥ तव प्रसादें हा लाभ पद्मनाभ जोडला ॥ ३ ॥ तुझ्या अवगुणाकार । नसे थोर कारण ॥ ४ ॥ अवगुण जाय ज्याचा । तो दैवाचा मोहरा ॥ ५ ॥ देहस्वभाव कठिण । गेल्या प्राण जाईना ॥ ६ ॥ उपदेशें खवळे कसा । जैसा ससा वागुरीं ॥ ॥ ७ ॥ दीप दीपवाळी गावीं । सुकरा चवी विष्ठेची ॥ ८ ॥ अनसूया परीसली । उठे रूसली ज्यारीण ॥ ९ ॥ ज्वाळा नृसिंह मंत्रांत । नाचे भूत स्वच्छंदें ॥ १० ॥ असो ज्याचा त्यास लाभ । तोचि क्षोभ इतरां ॥ ॥ ११ ॥ येथें हरीनें वर्णिलें । मागें झाले त्रिगुण ॥ १२ ॥ सत्व चोख मध्यम रज । तमा आज पतन ॥ १३ ॥ शुद्ध सत्व गुण उत्तम । तम अधम वोखटा ॥ १४ ॥ आतां पांडव परिवार । प्रिय शूर सत्व तें ॥ १५ ॥ भीष्म द्रोणा परी साह्य । रज होय सबळ तो ॥ १६ ॥ तमोगुणी ते कौरव । मेले जीव जाणार ॥ १७ ॥ तमाधम तूं दीससी । कीं निंदीसी गीतेला ॥ ॥ १८ ॥ शुद्ध सत्व ते गा जाण । जे सुजाण गीतेचें ॥ १९ ॥ आतां जेथें तो श्रीकृष्ण । योग विष्णु योगीया ॥ २० ॥ तैसा तेथें पार्थ वीर । धनुर्धर प्रतापी ॥ २१ ॥ माझ्या मतें तेथें जय । भाग्या लय श्री नीती ॥ ॥ २२ ॥ शाश्वत मती होरा । हा नवरा दीसतो ॥ २३ ॥ शेवटिचें हें उत्तर । दृढोत्तर दे ग्रंथीं ॥ २४ ॥ अंधा पावक शीतळ । किरण माळ होईल ॥ २५ ॥ मेरू चळेल आसनीं । हनुम्यामनीं स्त्री रीघे ॥ २६ ॥

न घडावें तें घडेल । परी बोल ना मिथ्या ॥ २७ ॥ ऐसा निष्ठुराचा बोल। लागे खोल शब्दातें ॥ २८ ॥ असो इकडे अर्जुन । सावधान रथेंसी ॥ २९ ॥ कपी मनीं हर्षान्वित । तो फोडित किंकाळी ॥ ३० ॥ जन्मेजया-सीं पावन । वैशंपायन बोलीला ॥ ३१ ॥ अठरा अध्ये ऐसी गीता । समाप्तता पावली ॥ ३२ ॥ मोक्ष संन्यास तो येथें । जगन्नाथें वर्णीला ॥ ॥ ३३ ॥ झाले अठरा अध्याय । ज्ञानोपाय चोखट ॥ ३४ ॥ श्रीगुरु पांडुरंगदास । पुरवी आस तुकया ॥ ३५ ॥

॥ ७९५४ ॥ जन्माचें सार्थक असेल ज्या करणें । आराधणें तेणें गी-ता देवी ॥ १ ॥ अज्ञान जाऊनी ज्ञानीं रत होणें । आराधणें तेणें गीता देवी ॥ २ ॥ शुद्ध प्रेम यावें वाणी शुद्ध करणें । आराधाणें तेणें गीता देवी ॥ ३ ॥ लक्ष्मीकांताची कृपा ज्यास घेणें । आराधणें तेणें गीता देवी ॥ ॥ ४ ॥ आरंभीलें व्रत शेवटा ज्या नेणें । आराधणें तेणें गीता देवी ॥ ५ ॥ साधन सिद्धीचें सौख्य जया घेणें । आराधणें तेणें गीता देवी ॥ ६ ॥ ज-न्ममृत्यु रोग परिहार करणें । आराधणें तेणें गीता देवी ॥ ७ ॥ कलियुग-प्रसंगें घडाति दुराचरणें । आराधणें तेणें गीता देवी ॥ ८ ॥ दृष्टादृष्ट पापें हेळा संहारणें । आराधणें तेणें गीता देवी ॥ ९ ॥ ऐसा गीतादशकुवरा जीवीं धरणें । आराधणें तेणें गीता देवी ॥ १० ॥ श्रीगुरुदासातें प्रेम तुका देणें । आराधणें तेणें गीता देवी ॥ ११ ॥

# चरित्रें.

## नृसिंहअवतारचरित्र.

॥ ७९५५ ॥ हरिच्या भक्तांसी गांजितो चांडाळ । तयासी गोपाळ अंगिकारी ॥ १ ॥ पिता पुसे पुत्रा लिहिलीं अक्षरें । वाचोनी सत्वर दावी आतां ॥ २ ॥ पुत्र वाची अक्षरें हरीनामपाठ । हरिनाम वैकुंठमार्ग सोपा ॥ ३ ॥ हरीनामपाठ ऐकोनी श्रवणीं । क्रोध त्याचे मनीं प्रकटला ॥ ४ ॥ कैंचें रामनाम आणिलीं अक्षरें । वधावया शिर धांविन्नला ॥ ५ ॥ पूर्वींचा वैरी आणियेला वाचे । काय ब्रिद त्याचें वानितोसि ॥ ६ ॥ वधिला प्रल्हाद बांधिला चरणीं । तेव्हां तो वनमाळी कुर्मरूप ॥ ७ ॥ कुर्मरूप धरुनी तारीला प्रल्हाद । तेव्हां गर्वामध्यें फुंदतसे ॥ ८ ॥ मरो ऐसा पुत्र न देखों नयनीं । गजाचे चरणीं बांधी त्यासी ॥ ९ ॥ आणियेला गज बांधिला चरणीं । गोविंद आणोनी सेज करी ॥ १० ॥ देखोनियां पुत्रा कोप आला भारी । अग्नीच्या भीतरीं टाकियेला ॥ ११ ॥ टाकितां प्रल्हाद आग शांत झाली । सांभाळी माउली कृष्णनाथ ॥ १२ ॥ पर्वता वरोनी टाकिला प्रल्हाद । सांभाळी गोविंद वरच्यावरी ॥ १३ ॥ रामकृष्ण ध्यानीं गर्जला प्रल्हाद । पिता गर्वामध्यें क्रुद्ध भारी ॥ १४ ॥ हरीच्या भक्तासी विघ्न केलें भारी । तारीतो श्रीहरी वेळोवेळां ॥ १५ ॥ न चले उपाय बोलाविली कांता । तियेसी ममता बोले गुज ॥ १६ ॥ प्रल्हादासी विष द्यावें त्वां सत्वरी । पुत्र नव्हे वैरी जन्मा आला ॥ १७ ॥ आवेशें ह्मणोनी धांविन्नली माय । येरे पुत्रराया कवळीला ॥ १८ ॥ धरोनियां हातीं बैसवी भोजना । आंसू ये नयना जळ वाहे ॥ १९ ॥ नवमास उदरीं कासया ठेविला । विष द्यावयाला चांडाळीनें ॥ २० ॥ तुजवीण प्रल्हादा काय करूं आतां । तुझा तुज पिता विष घाली ॥ २१ ॥ पुत्रा विष देतां न दे शके माता । गुणाची ममता बाधितसे ॥ २२ ॥ भ्रताराची आज्ञा मोडितां गे माते । पाप तें अद्भुत जन्मावरी ॥ २३ ॥ देई माते विष नको धरूं करुणा । श्रीयाळ चांगुणा पुत्रदान ॥ २४ ॥ रुक्मांगद कांता छेदिती पुत्रासी । रुक्मांगद एकादशी ह्मणोनियां ॥ २५ ॥ सुकुमार बाळ मोकलिलें वनीं । तयासी

भोजन अमृतबिंदु ॥ २६ ॥ नको येऊं माते पहा काकुळती । मृत्यु तुझ्या हातीं थोर भाग्यें ॥ २७ ॥ पित्याचें वचन करी माते सत्य । सत्वर दोष होत मोडीतां तें ॥ २८ ॥ पुत्राचें वचन धरोनियां कंठीं । भरोनियां वाटी विष घाली ॥ २९ ॥ विषाची ती वाटी लावियेली ओंठीं । घट घट घोटी प्रेमरस ॥ ३० ॥ पिता पाहे पुत्र हरिनामें गर्जत । पाचारोनी त्यातें काय बोले ॥ ३१ ॥ कैंचा राम कृष्ण कोण तुज रक्षीत । ह्मणोनियां हात खड्गा घाली ॥ ३२ ॥ जळीं स्थळीं राम काष्ठीं ही पाषाणीं । खांबांत ह्मणोनी हात घाली ॥ ३३ ॥ खांबावरी लाथ मारिली दुर्जनें । खांबीं नारायण प्रगटला ॥ ३४ ॥ आंसडोनी विधी पाडी मांडीवरी । नखाचिये अग्रीं उर्ध्व चिरी ॥ ३५ ॥ मारियेला दैत्य प्रल्हाद रक्षिला । तुका ह्मणे त्याला विसरूं नको ॥ ३६ ॥

---

## प्रल्हादचरित्र.

॥ ७९५६ ॥ बोलावूनी पीता पुसे प्रल्हादासी । काय शिकलासी सांग बापा ॥ १ ॥ येरू ह्मणे हरीनाम वसे चित्तीं । बहूतची प्रीति त्याची मज ॥ २ ॥ मरो झडो पडो तुटो हें शरीर । वाचे निरंतर हेंची घोकीं ॥ ३ ॥ राग आला दुष्टा आज्ञा केली दूता । धरा बांधा लाता मारा यासीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे दूतीं केली जे यातना । एक नारायणा ठावी असे ॥ ५ ॥

॥ ७९५७ ॥ पर्वतावरूनीं लोटिला प्रल्हाद । परी तो गोविंद विसरेना ॥ १ ॥ वरूनीयां त्यांणीं लोटियेल्या धोंडी । खचल्या दरडी पर्वताच्या ॥ २ ॥ पक्षी श्वापदासीं वर्तला प्रलय । ह्मणती हायहाय जनलोक ॥ ३ ॥ पाहाती तो उभा जैसा तैसा आहे । चिंतीतसे पाय गोविंदाचे ॥ ४ ॥ तुका ह्मणे ज्याचें मुखीं नाम आहे । विघ्नाचें तें भय काय असे ॥ ५ ॥

॥ ७९५८ ॥ आणविला हत्ती बहु बळिवंत । मस्त मदोन्मत्त धीट सदा ॥ १ ॥ लोटीयेला वरी दया नाहीं पोटीं । दुर्जन तो हटीं पडियेला ॥ २ ॥ जवळी येतां हरीनाम गर्जे वाणी । पळतां मेदिनी थोडी झाली ॥ ३ ॥ दृष्टी देखियेला गजाचा तो वैरी । तेणें नेत्रा चंद्री लागलीसे ॥ ४ ॥ मारितां अंकुश न फिरती मागें । सोडियेला वेगें प्राण त्यांनीं ॥ ५ ॥ तुका ह्मणे वसे ज्याचे मुखीं नाम । भवजगभ्रम काय करी ॥ ६ ॥

॥ ७९५९ ॥ बांधोनी पाषाण बुडाविला सागरीं । ठेवियेल्या वरी शीळा थोर ॥ १ ॥ आप नारायण रक्षी निज दासा । लोटोनी सरसा कडे लावी ॥ २ ॥ न बुडेची कांहीं करीतां उपाय । रक्षी तया देव मागें पुढें ॥ ३ ॥ तुका ह्मणे देव भक्तां साह्यकारी । रक्षी नानापरी संकटें तो ॥ ४ ॥

॥ ७९६० ॥ भवसागरीचें । निजदासां भय कैचें ॥ १ ॥ बुडवितां जळीं तेथें रक्षी वनमाळी ॥ २ ॥ तुका ह्मणे आंगीं । राखी जळसा प्रसंगीं ॥ ३ ॥

॥ ७९६१ ॥ पाचारिले व्याळ लाविले शरीरीं । अंगा चहूंफेरी वेष्टीयेले ॥ १ ॥ भयानक रूप मुखीं उठे ज्वाळा ॥ सर्वांगासी कळा लावियेल्या ॥ २ ॥ नाम धडपडां जपे वेळोवेळां । तेणें कळिकाळा कांप सुटे ॥ ३ ॥ दुष्ट विखारांनीं गरुड देखिला । अंतक भेटला भक्षावया ॥ ४ ॥ तुका ह्मणे विघ्न थोर वोढवलें । मरण पावलें दुर्जनांसीं ॥ ५ ॥

॥ ७९६२ ॥ वाटीभरी वीष दिल्हें प्रल्हादासीं । निर्भय मानसीं तया बळें ॥ १ ॥ भोक्ता नारायण केलें तें प्राशन । प्रतापें जीवन झालें तुझ्या ॥ २ ॥ नामाचें चिंतनें विषाचें अमृत । जाहलें देखतां नारायणा ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसे तुझे बडिवार । शिणला फणिवर वर्णवेना ॥ ४ ॥

॥ ७९६३ ॥ अग्निकुंडामाजी घातला प्रल्हाद । तरी तो गोविंद विसरेना ॥ १ ॥ पितयासी ह्मणे व्यापक श्रीहरी । नांदतो मुरारी सर्वां ठायीं ॥ २ ॥ अग्निरूप माझा सखा नारायण । प्रल्हाद गर्जून हाका मारी ॥ ३ ॥ तुका ह्मणे अग्नि झालासे शीतळ । प्रतापाचें बळ विठो तुझ्या ॥ ४ ॥

॥ ७९६४ ॥ कोपोनियां पिता पुसे प्रल्हादासी । सांग हृषीकेशी कोठें आहे ॥ १ ॥ येरू ह्मणे काष्ठीं पाषाणीं सकळीं । आहे वनमाळी जेथें तेथें ॥ २ ॥ खांबावरी लात मारिली दुर्जनें । स्तंभीं नारायण प्रकटला ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसा खांब कडाडला । ब्रह्मा दचकला सत्यलोकीं ॥ ४ ॥

॥ ७९६५ ॥ डळमळिला मेरू आणि तो मांदार । पाताळीं फणिवर डोई झाडी ॥ १ ॥ लोपलासे गगनीं चंद्र आणि सूर्य । कांपतसें इंद्र थरथरां ॥ २ ॥ ऐसें नरहरिरूप प्रगटलें । दैत्यासी मारलें मांडीवरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे भक्तांकारणें श्रीहरी । बहु दुराचारी निर्दाळिले ॥ ४ ॥

॥ ७९६६ ॥ प्रल्हादाकारणें नरहरी झालासी । त्याचीया बोलासी सत्य केलें ॥ १ ॥ विठ्ठल माधव मुकुंद केशव । तेणें दैत्यराव भीत मनीं ॥ २ ॥ राम कृष्ण विष्णु मारीयेली हांक । तेणें पडे धाक बळीयासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे तयाकारणें सगुण । भक्तांचें वचन पाळावया ॥ ४ ॥

## श्रीवामनअवतारचरित्र.

॥ ७९६७ ॥ न्याय नीति राज्य चालवी भूपती । न करिती क्षीती भूपपरी ॥ १ ॥ न करिती इंद्र चंद्र आदि यम । पाळीताती नेम आज्ञा शीरीं ॥ २ ॥ पूजिले ब्राह्मण देव भक्त गुरू । पवित्र सागरू बळीराज ॥ ३ ॥ एके दिनीं पूसे प्रार्थोनी शुक्रासी । भेटी केशवासी होय कैसी ॥ ४ ॥ गुरू ह्मणे अग्नि संतुष्ट भोजना । करावें ब्राह्मणां यथारूची ॥ ५ ॥ तुका ह्मणे जेव्हां सर्वस्वें उदार । तेव्हां विश्वंभर कृपा करी ॥ ६ ॥

॥ ७९६८ ॥ पाळीयेली आज्ञा गुरूचें वचन । आणियलें धन अनिवार ॥ १ ॥ मांडियेला याग नर्मदेच्या तीरीं । ऋषी परीवारीं पाचारीले ॥ २ ॥ मूर्तिमंत देव दिक्पाल ठेविले । रक्षणा स्थापीले रक्षपाळ ॥ ३ ॥ कुंडीं बैसवीला अग्नि मूर्तिमंत । आपण दिक्षीत बैसलासे ॥ ४ ॥ तुका ह्मणे शुक्र टाकीतो आहूती । मिळोनी भोंवती ऋषीवृंदें ॥ ५ ॥

॥ ७९६९ ॥ संकटीं पडला तेव्हां पुरंदर । नचले विचार बळ कांहीं ॥ १ ॥ जाय शरणागत तेव्हां ब्रह्मयासी । ह्मणे उपायासी करा कांहीं ॥ २ ॥ उठोनी विरंची क्षीराब्धींत गेला । सत्वरीं प्रार्थिला नारायण ॥ ॥ ३ ॥ तुका ह्मणे दयासागर श्रीहरी । कृपावंता करीं सांगितलें ॥ ४ ॥

॥ ७९७० ॥ सांगे वर्तमान याग करी बळी । छळीतां ही छळी नाटोपेचि ॥ १ ॥ तेव्हां पांडुरंगें केलें समाधान । स्वस्थळा सन्मानें पाठविलें ॥ २ ॥ आदितीच्या पोटीं धरी अवतार । देखोनी साचार व्रत तीचें ॥ ३ ॥ पाहोनियां उग्र तप कश्यपुचें । जन्म वामनाचें तया घरीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे घरीं ओवाळी मंगळें । आनंदिलीं कुळें ऋषींचीं हीं ॥ ५ ॥

॥ ७८७१ ॥ चिमणा सुंदर सांवळा राजस । बाळ भोग वेष धरीयेला ॥ १ ॥ नामकर्ण केलें वामनालागून । केलें उपनैन सप्तवर्षी ॥ २ ॥

दंड कमंडलु हातीं शोभलासे । निघाला भिक्षेस मागावया ॥ ३ ॥ संगें ऋषीमुलें चिमणीं चांगलीं । कंठीं हे शोभलीं ब्रह्मसूत्रें ॥ ४ ॥ ऋषीसंगें आला बळी करी याग । तेथें उभा मग राहीलासे ॥ ५ ॥ तुका ह्मणे ठक पडलें सकळा । पाहोनी गोपाळा आनंदले ॥ ६ ॥

॥ ७९७२ ॥ ह्मणती हा कोण आलासे कोठून । न देखिला मन भूलवितो ॥ १ ॥ कर्णींचीं कुंडलें अति ढाळ देती । लोपला गभस्ती नखचंद्रीं ॥ २ ॥ उठोनियां राजा देव पुजियेले । बैसावया दिल्हें रत्नपीठ ॥ ३ ॥ बैसा स्वामी तुह्मी नामकर्ण सांगा । अपेक्षित मागा आजी मज ॥ ४ ॥ तुका ह्मणे धन्य दिवस उदेला । भिक्षा मागों आला नारायण ॥ ५ ॥

॥ ७९७३ ॥ धन्य तोचि दीन न वर्णवे सृष्टीं । भिक्षामिषें भेटी घेऊं आला ॥ १ ॥ धन्य मानी बळी मी एक दैवाचा । मागील भाग्याचा ठेवा लाभे ॥ २ ॥ मागा ह्मणे बळी इच्छेचा पदार्थ । चित्ताचा जो आर्त असे कांहीं ॥ ३ ॥ तेव्हां बळीराया ह्मणे नारायण । अपेक्षा हे आन नाहीं तूजी ॥ ४ ॥ ब्रह्मचारी व्रत नेम संपादीला । आश्रम पाहीला नाहीं कोठें ॥ ५ ॥ ऐकोनियां कीर्ति आलों मागावया । देई बैसावया ठाव मज ॥ ६ ॥ तुका ह्मणे भक्तां घरीं नारायण । मागतसे दान नवल हें ॥ ७ ॥

॥ ७९७४ ॥ बळी ह्मणे बैसा करीन मी पूजा । अंगिकारा माझा भक्तिभाव ॥ १ ॥ सोडावा संकल्प दिलें ऐसें दान । मोजोनियां तीन पदें मज ॥ २ ॥ तेव्हां बैसावया स्वस्थ वाटे चित्त । बळी ह्मणे हेत पूर्ण करा ॥ ३ ॥ आणविली झारी संकल्प उदीतु । वर्ते अघटीतू गोष्टी एक ॥ ४ ॥ राजगुरु शुक्र ह्मणे नृपवर्या । देऊं नका यया दान कांहीं ॥ ५ ॥ विश्वाचा पाळक आला वेषधारी । तया पुरे धरी एक पदा ॥ ६ ॥ तुका ह्मणे विश्व हेळाच निर्वाणी । तयाचे तुळणीं काय असे ॥ ७ ॥

॥ ७९७५ ॥ देईन मी ऐसें ह्मणशील जेव्हां । न पुरेचि तेव्हां विश्व सारें ॥ १ ॥ दिसतो लहान ह्मणसी वामन । संकल्पितां मन कळों येतें ॥ २ ॥ ठावा आहे मज मोजील पदवी । न पडेचि ऊर्वी एक पदा ॥ ॥ ३ ॥ न मिळतां पुढें कर्मीं लागे धोका । शेवीं तुज नर्का जाणें लागे ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऊभा देव हा याचक । तयासी विन्मुख होतां नये ॥ ५ ॥